# प्रा. डॉ. एस. आर. वराडे यांचा सेवानिवृत्ती समारंभ

शिक्षक म्हणून विद्यार्थी घडवत असतांना विद्यार्थी हीच संपत्ती मानल्याने आज सेवानिवृत्त होत असतांना आम्ही खूप श्रीमंत आहोत, असे मनोगत प्रा. डॉ. सुरेश वराडे यांनी मांडले. बोदवड महाविद्यालयात त्यांना सेवानिवृत्तीनिमित्त निरोप दिला. यावेळी ते बोलत होते. संस्थेचे चेअरमन मिठूलाल अग्रवाल अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे सचिव विकासजी कोटेचा, ॲड. प्रकाशचंदजी सुराणा, अशोकजी कोटेचा, प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी प्रमुख म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष श्री. मिठूलालजी यांनी वराडे दाम्पत्याचा सत्कार केला. प्रा. डॉ. मधू खराटे, कार्यालय अधीक्षक श्री. व्ही. एस. बडगुजर, प्रा. डॉ. गीता पाटील, प्रा. डॉ. जी. एस. चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. शरद काठोके यांनी सुत्रांचालन केले.






